पी.एच.डी संशोधन आराखडा

"संत एकनाथांच्या साहित्यातील मनुष्यजीवनविषयक चिंतनाचा चिकित्सक अभ्यास"

(विशेष संदर्भ- एकनाथी भागवत व संत एकनाथांची अभंगगाथा)

मानव्यविद्याशाखेअंतर्गत मराठी विषयातील पीएच.डी. (विद्यावाचस्पती) या पदवीकरीता

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड

यास सादर करावयाच्या शोध प्रबंधाचा आराखडा

:: संशोधक ::

इबितवार राजेश्वर यलप्पा

श्री साईबाबा मा. व उच्च मा. विद्यालय शंकरनगर

ता.बिलोली जि.नांदेड

:: मार्गदर्शक ::

प्रा. डॉ. शरदचंद्र देगलूरकर,

मराठी विभाग प्रमुख

श्री म.बा.पा. खतगावकर महाविद्यालय,शंकरनगर.

ता.बिलोली जि.नांदेड

:: संशोधन केंद्र ::

मराठी विभाग

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड

सप्टेंबर२०२३

संत एकनाथांच्या साहित्यातील मनुष्यजीवनविषयक चिंतनाचा चिकित्सक अभ्यास

(विशेष संदर्भ.. एकनाथी भागवत व संत एकनाथांची अभंगगाथा)

प्रस्तावना..

संत साहित्य हे अनेक दृष्टीने समृद्ध असे साहित्य आहे. संत एकनाथांचे साहित्य वेगवेगळ्या वाङ्मय प्रकारांनी अत्यंत समृद्ध असलेले साहित्य आहे. संत एकनाथांनी एकनाथी भागवत, भावार्थरामायण ,रुक्मिणी स्वयंवर, चतुश्लोकी भागवत ,अभंगगाथा तसेच इतर काही प्रकरणे अशी विपुल वाङ्मय निर्मिती केली आहे.

संत एकनाथांनी ओवी ,अभंग ,भारुडे ,पदे अशा विविध प्रकारात आपली वैचारिक व कथात्मक स्वरूपाची निर्मिती केलेली आहे. समकालीन परिस्थितीशी जुळणारे, समकालीन समाजाचे प्रबोधन करणारे व सर्वसामान्यांना सहजपणे समजेल अशा लोकभाषेतून उपदेश करणारे वाङ्मय संत एकनाथांनी निर्माण केले व अत्यंत प्रतिकूल राजकीय सामाजिक परिस्थितीत समाजाचे प्रबोधन केले. मनुष्य देह हा अत्यंत दुर्लभ असून त्याचा सदुपयोग करून आपले कल्याण साध्य करून घ्यावे ,हा विचार संत एकनाथांनी वेळोवेळी विस्ताराने मांडलेला दिसून येतो.

संशोधनाचे महत्त्व...

संत एकनाथांच्या संपूर्ण साहित्यात मनुष्यजीवनविषयक, नरदेहाविषयी अत्यंत विस्ताराने चिंतन आलेले आहे. भारतासारख्या अध्यात्मप्रधान देशामध्ये मनुष्यजीवनविषयक मिळणे हे संत एकनाथांनी भाग्याचे मानलेले आहे .मनुष्य जन्माची प्राप्ती झाल्यानंतर जीवाने कोणत्या ध्येयाच्या प्राप्तीसाठी प्रयत्न करावा ,याविषयी संतांनी मांडलेला विचार परमार्थिक संदर्भातला असला तरी त्या विचाराचे सामाजिक, नैतिक दृष्टीनेही अत्यंत महत्त्व आहे.

समकालीन मनुष्याची वाटचाल ही भोगवादाकडे चालू आहे .मानवी जीवनविषयक मूल्यविचाराची पर्वा न करता, मनुष्य जीवनाचे सार्थक कशात आहे, याबद्दलच्या भारतीय पारंपरिक धारणेचा विचार न करता, मनुष्याचे जीवन भोगप्रधान बनत आहे. पुरुषार्थांचे मनुष्याच्या जीवनातील प्राधान्य आणि औचित्य कमी होत आहे . चतुर्विध पुरुषार्थाऐवजी केवळ अर्थ आणि काम हे दोनच पुरुषार्थ आजचा मनुष्य मानत आहे .अशावेळी मनुष्याला धर्म आणि मोक्ष या पुरुषार्थांचे महत्त्व पटवून देऊन मनुष्याच्या जीवनाचे सार्थक होण्याच्या दृष्टीने संतांनी मांडलेला विचार समकालीन सामाजिक जीवनाच्या दृष्टीनेही उपयुक्त आहे असे दिसून येते. त्यामुळे संतांचा मनुष्यजीवनविषयक विचार सूक्ष्मपणे अभ्यासणे ही आजच्या काळाची गरज आहे असे दिसून येते.

संशोधनाची व्याप्ती आणि मर्यादा...

मराठी संत साहित्यात व संतांनी प्रमाणभूत मानलेल्या संस्कृत साहित्यातही मनुष्य देहाविषयीचे सखोल चिंतन आलेले आहे. संतांनी परमार्थाच्या दृष्टीने मनुष्यजीवनविषयक महत्त्व वेगवेगळ्या पद्धतीने सांगितलेले दिसून येते. प्रस्तुत शोध प्रबंधात संत एकनाथांच्या साहित्यातील मनुष्यजीवनविषयीच्या चिंतनाचा विस्ताराने अभ्यास करावयाचा आहे. त्याचप्रमाणे एकनाथ पूर्वकालीन संतांचे मनुष्यजीवनविषयक चिंतनही प्रस्तुत प्रबंधात एकनाथांच्या विचारांची पार्श्वभूमी या दृष्टीने अभ्यासावयाचे आहे.

संशोधनाची उद्दिष्टे...

संत एकनाथांच्या साहित्यातील मनुष्यजीवनविषयक चिंतनाचा चिकित्सक अभ्यास(विशेष संदर्भ एकनाथी भागवत व संत एकनाथांची अभंग गाथा) या विषयावर संशोधन करण्यासाठी पुढील उद्दिष्टे निश्चित करण्यात आलेली आहेत.

१. संत एकनाथांनी आधारभूत मानलेल्या साहित्यातील मनुष्यजीवनविषयक चिंतनाचा चिकित्सक अभ्यास करणे.

२. संत एकनाथ पूर्वकालीन संतांच्या मनुष्यजीवनविषयक चिंतनाचा चिकित्सक अभ्यास करणे.

३. एकनाथी भागवतातील मनुष्यजीवनविषयक चिंतनाचा चिकित्सक अभ्यास करणे.

४. संत एकनाथांच्या अभंग गाथेतील मनुष्यजीवनविषयक चिंतनाचा अभ्यास करणे.

५. संत एकनाथांनी केलेल्या मनुष्यजीवनविषयक चिंतनाचा चिकित्सक समकालीन संदर्भात उपयुक्तता अभ्यासणे.

गृहीतके....

प्रस्तुत विषयावरील संशोधनासाठी पुढील प्रमाणे गृहीतके निश्चित करण्यात आली आहेत.

१ संत एकनाथांच्या पूर्वकालीन संत साहित्यातून मनुष्यजीवनविषयक चिंतन वेळोवेळी आलेले आहे.

२ एकनाथी भागवतात मनुष्यजीवनविषयी विस्ताराने चिंतन आलेले आहे.

३संत एकनाथांच्या अभंगगाथेत मनुष्यजीवनविषयी चिंतन करणारे अनेक अभंग आहेत.

४ समकालीन संदर्भात संतांनी केलेल्या मनुष्यजीवनविषयक चिंतनाची सामाजिक नैतिक दृष्टीने विशेष उपयुक्तता आहे.

संशोधन पद्धती...

प्रस्तुत विषयाचा अभ्यास करण्यासाठी विश्लेषणात्मक व तुलनात्मक संशोधन पद्धतीचा अवलंब केला जाणार आहे. संत एकनाथांच्या साहित्यातील मनुष्यजीवनविषयक विचारांचा

अभ्यास करत असताना आवश्यक असलेल्या ठिकाणी आस्वादक संशोधन पद्धतीचादेखील अवलंब केला जाईल.

प्रकरण निहाय मांडणी...

१. मनुष्यजीवन : संकल्पना व स्वरूप.

मनुष्यजीवनविषयी भारतीय वाड्.मयीन परंपरेत विस्ताराने चिंतन आलेले दिसून येते. भारतीय धार्मिक साहित्यात येणारे मनुष्यजीवन महत्त्व प्रस्तुत प्रकरणात विचारात घेण्यात येईल. त्या आधारे मनुष्य जन्म , नरजन्म, नरदेह, मनुष्यत्व, मुमुक्षुत्व अशा महत्त्वाच्या संकल्पनांचे स्वरूप प्रस्तुत प्रकरणात स्पष्ट करण्यात येईल.

२. गीता व भागवत या ग्रंथातील मनुष्यजीवन विषयक चिंतन.

संत एकनाथांनी गीता व भागवत या ग्रंथांना आपल्या वाङ्मय निर्मितीच्या प्रेरणास्थानी मानलेले आहे. एकनाथांनी ज्या वाड्मयाला प्रेरणास्थानी मानलेले आहे अशा वाङ्मयातील मनुष्यजीवनविषयक चिंतनाचा विचार प्रस्तुत प्रकरणात करावयाचा आहे.

३. संत एकनाथ पूर्वकालीन संतांचे मनुष्यजीवनविषयक चिंतन.

संत एकनाथांच्या पूर्वकालीन संतांच्या साहित्यात मनुष्यजीवनविषयक चिंतन आलेले आहे. या संतांनी मांडलेला मनुष्यजीवनविषयक विचार संत एकनाथांच्या विचारांशी जुळणारा असाच आहे. संत एकनाथांच्या विचारांची पार्श्वभूमी म्हणून अशा निवडक संतांच्या मनुष्यजीवनविषयक विचारांचा मागोवा प्रस्तुत प्रकरणात घेण्याचा मानस आहे.

४. एकनाथी भागवतातील मनुष्यजीवनविषयक चिंतन.

एकनाथी भागवत हा ग्रंथ संत एकनाथांच्या संपूर्ण साहित्याच्या केंद्रस्थानी असलेला एक महत्त्वाचा विशाल ग्रंथ आहे. वारकरी संप्रदायात या ग्रंथाचे विशेष महत्त्व मानले जाते. या ग्रंथातील मनुष्यजीवनविषयक चिंतन हे सर्व संत वाङ्मयाच्या अध्ययनाच्या दृष्टीने महत्त्वाचे आहे. एकनाथी भागवत या ग्रंथातील हे मनुष्यजीवनविषयक चिंतन प्रस्तुत प्रकरणात अभ्यासावयाचे आहे.

५. संत एकनाथांच्या अभंग गाथेतील मनुष्यजीवनविषयक चिंतन.

संत एकनाथ हे ज्याप्रमाणे भाष्यकार होते त्याप्रमाणे ते अभंगवाणीचे निर्मातेही होते. एकनाथीभागवत ,चतुश्लोकी भागवत या ग्रंथांच्या निर्मिती सोबतच त्यांनी अभंगगाथेचीही निर्मिती केलेली आहे. एकनाथांच्या या अभंगवाणीतही मनुष्यजीवनविषयीचे चिंतन जागोजागी व्यक्त झालेले आहे. या चिंतनाचा अभ्यास प्रस्तुत प्रकरणात करण्यात येईल.

६. निष्कर्ष व समारोप.

संत एकनाथांच्या साहित्यातील मनुष्यजीवनविषयक चिंतनाचा चिकित्सक अभ्यास
(विशेष संदर्भ. एकनाथी भागवत व संत एकनाथांची अभंगगाथा.)
या विषयाच्या संदर्भात वरील प्रमाणे प्रकरणनिहाय जो अभ्यास केला जाणार आहे त्या अभ्यासातून

प्राप्त होणारे निष्कर्ष व त्या निष्कर्षांचे विश्लेषण प्रस्तुत प्रकरणात करण्यात येईल.

संदर्भ ग्रंथ सूची..

१. भावार्थ एकनाथी भागवत.. ले.वै.शंकर महाराज खंदारकर.वै. शंकर महाराज खंदारकर विश्वस्त संस्थेचे प्रकाशन २०१२.

२.श्री एकनाथ महाराजांचे अभंग.. श्री सकलसंतवाणी ..मराठी ..खंड दुसरा.. गीता प्रेस ,गोरखपुर. चतुर्थ पुनर्मुद्रण.

३. पाच संतकवी.. शं.गो. तुळपुळे. प्रकाशक शं.गो. तुळपुळे. श्री गणपती संस्थान प्रेस सांगली, प्रथम आवृत्ती १९४८.

४. ज्ञानेश्वरी भावदर्शन.वै. शंकर महाराज खंदारकर
वै. शंकर महाराज खंदारकर विश्वस्त संस्थेचे प्रकाशन २००९.

संशोधक
इबितवार राजेश्वर यलप्पा
श्री साईबाबा मा. व उच्च मा. विद्यालय,
शंकरनगर.
ता.बिलोली जि.नांदेड

मार्गदर्शक
प्रा. डॉ. शरदचंद्र देगलूरकर,
मराठी विभाग प्रमुख
श्री म.बा.पा. खतगावकर महाविद्यालय,शंकरनगर.
ता.बिलोली जि.नांदेड